ज्ञानवर्धिनी संस्थेचे

# सोनुभाऊ बसवंत कला व वाणिज्य महाविद्यालय, शहापूर

## महिला विकास कक्ष

---

## 'मी उद्योजक होणार...' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा

### अहवाल

शुक्रवार दि. ३० जानेवारी २०२६ रोजी शहापूर येथील ज्ञानवर्धिनी संस्थेच्या सोनुभाऊ बसवंत कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता निर्धारण कक्ष, महिला विकास कक्ष, महाराष्ट्र शासन कृषी विभाग, शहापूर आणि विशाखा फोरम यांच्या संयुक्त विद्यमाने 'मी उद्योजक होणार...' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकतेची जाणीव व सकारात्मक दृष्टिकोन विकसित करणे, नोकरी शोधणारा नव्हे तर नोकरी देणारा बनण्याची मानसिकता घडवणे, स्टार्टअप, नवउद्योजकता, स्वयंरोजगाराच्या संधी व संकल्पना विद्यार्थ्यांना समजावून सांगणे, आणि प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेची सविस्तर माहिती देणे या उद्देशाने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यशाळेचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य व मुंबई विद्यापीठाच्या मानव्य विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रो. डॉ. अनिलकुमार सिंह यांनी भूषविले. अध्यक्षीय भाषणात सरांनी विद्यार्थ्यांना उद्योजकता आणि स्वावलंबनाचे महत्त्व पटवून दिले. या कार्यशाळेस प्रमुख वक्ते म्हणून श्री. सतीश मोहपे (मंडळ कृषी अधिकारी, शहापूर), श्री. निलेश आंबेकर, (मंडळ कृषी अधिकारी, शहापूर), श्री. प्रविण निकम (सहाय्यक कृषी अधिकारी, शेई), आणि श्रीमती. कल्पना साबळे (सहाय्यक कृषी अधिकारी, वासिंद) इ. मान्यवर उपस्थित होते. कार्यशाळेचे प्रास्ताविक महिला विकास कक्षाच्या समन्वयक डॉ. सीमा परटोले यांनी केले.

प्रमुख वक्ते श्री. सतीश मोहपे यांनी विद्यार्थ्यांना उद्योजकतेचे महत्त्व व संधी, आत्मविश्वास व जोखीम स्वीकारण्याची तयारी, व्यवसाय कल्पना (Business Idea) विकसित करण्याचे मार्ग, प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग (PMFME) योजनेचे उद्दिष्ट व महत्त्व, वैयक्तिक व गट उद्योजकांसाठी लाभ, आर्थिक सहाय्य व अनुदानाची माहिती, कर्ज सुविधा व बँक प्रक्रियेचे मार्गदर्शन, पात्रता अटी, अर्ज करण्याची ऑनलाईन प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रांची माहिती, ODOP (One District One

Product) संकल्पना, स्थानिक अन्नप्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन आणि रोजगार निर्मिती व स्वयंपूर्णतेवर भर याबाबत मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले. या कार्यशाळेस महाविद्यालयातील १२ प्राध्यापक आणि ५२ विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यशाळेचे सूत्रसंचालन विशाखा फोरम सदस्य कु. सानिया पराड हिने केले. तर आभार प्रदर्शन विशाखा फोरम सदस्य कु. रूपाली सानकरे हिने केले. सदर कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. अनिलकुमार सिंह, उपप्राचार्य डॉ. संतोष गायकवाड, IQAC समन्वयक प्रो. डॉ. शहाजी वाघमोडे, महिला विकास कक्षाच्या समन्वयक डॉ. सीमा परटोले, महिला विकास कक्षाच्या सदस्या प्रा. सरला कातकाडे, प्रा. अर्चना घनघाव, डॉ. अश्विनी ओव्हाळ, प्रा. स्वाती फर्डे, प्रा. मोनिका बांगर आणि प्रा. स्वाती जाधव, विशाखा फोरम सदस्य, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विशेष सहकार्य केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीत गायनाने झाली.